# वेळोवेळी विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

## अ) छायाचित्र मतदार ओळखपत्र (इपिक)

### (१) छायाचित्र मतदार ओळखपत्र म्हणजे काय ?

मतदार नोंदणी अधिकारी यांचेमार्फत विधानसभा मतदार यादीमध्ये नांव नोंदणी केलेल्या मतदारांना भारत निवडणूक आयोगाचे वतीने छायाचित्र मतदार ओळखपत्र दिले जाते. निवडणूकीचे वेळी मतदान करतांना ओळखीचा पुरावा म्हणून याचा उपयोग केला जातो

### (२) छायाचित्र मतदार ओळखपत्र मिळणेसाठी पात्रता.

अंतिम प्रसिध्द झालेल्या विधानसभा मतदार यादीमध्ये नोंदणी केलेल्या मतदारास छायाचित्र मतदार ओळखपत्र दिले जाते. ज्या मतदाराचे नांव विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेले नाही अशा मतदारांना छायाचित्र मतदार ओळखपत्र दिले जात नाही.

### (३) छायाचित्र मतदार ओळखपत्र कसे तयार केले जाते.

छायाचित्र मतदार ओळखपत्र दोन प्रकारे तयार केले जाते.

(अ) ज्यावेळी भारत निवडणूक आयोगातर्फे पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला जातो. त्यावेळी मतदारांचे छायाचित्र गोळा करणेकामी पदनिर्देशित ठिकाण (मतदान केंद्राचे ठिकाणी) जाहीर करण्यात येतात त्या ठिकाणी ज्या मतदारांचे छायाचित्र मतदार यादीमध्ये समाविष्ट झालेले नाही अशा मतदारांनी फॉर्म नं.८ भरुन व दोन छायाचित्र जमा केल्यानंतर सदर मतदाराला छायाचित्र मतदार ओळखपत्र तयार करुन दिले जाते.सदरची कार्यवाही विधानसभा मतदार संघामधील संबंधित मतदार नोंदणी अधिकारी (उपविभागीय अधिकारी) यांचे मार्फत केली जाते.

(ब) जर मतदार म्हणून विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नांव नोंदणी झालेली नसल्यास वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तींनी विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरुन त्यासोबत दोन पासपोर्ट साईज फोटो जोडून बीएलओ/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (तहसिलदार) यांचेकडे दाखल केल्यानंतर प्राप्त अर्जाची चौकशी करणेत येऊन संबंधित मतदाराचे नांव मतदार यादीमध्ये समाविष्ट करणेत येऊन छायाचित्र मतदार ओळखपत्र तयार करुन संबंधित मतदार यांना बीएलओ यांचेमार्फत देणेत येते.

### (४) छायाचित्र मतदार ओळखपत्र कसे प्राप्त करावे ?

प्रथम मतदाराने त्यांचे नांव विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट आहे किंवा कसे हे तपासावे. अद्ययावत विधानसभा मतदार संघाची मतदार यादी तहसिलदार यांचे कार्यालयात पहावयास उपलब्ध करणेत आलेली आहे. तसेच www.ceo.maharashtra.gov.in किंवा www.ahmednagar.gov.in या संकेतस्थळावर

साधून भविष्यात छायाचित्र मतदार ओळखपत्र वाटपाचा कार्यक्रम कधी होणार आहे याची माहिती प्राप्त करावी. सदरचा कार्यक्रम भविष्यात होणार नसेल तर संबंधित मतदाराने मतदार यादीमध्ये नांव असून मतदार यादीमध्ये छायाचित्र आलेले नसल्यास छायाचित्र मतदार ओळखपत्र मिळणेकामी विहित नमुना नं.८ मध्ये माहिती भरुन त्यासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडून अर्ज संबंधित बीएलओ किंवा तहसिल कार्यालयामध्ये जमा करावा. मतदार यादीमध्ये नांव आलेले नसल्यास विहित नमुना नं.६ (नवीन नांव नोंदणीकामी) मध्ये माहिती भरुन त्यासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडून अर्ज संबंधित बीएलओ किंवा तहसिल कार्यालयामध्ये जमा करावा. व बीएलओ यांचेमार्फत छायाचित्र मतदार ओळखपत्र प्राप्त करुन घ्यावे.

## (५) मतदार नोंदणी अधिकारी कोण आहे?

प्रत्येक विधानसभा मतदार संघाकरिता भारत निवडणूक आयोगामार्फत एका मतदार नोंदणी अधिकारी यांची नियुक्ती केली जाते. साधारणतः महसूल उपविभागातील उपविभागीय अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदार संघाकरिता मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. नियुक्ती केलेल्या मतदार नोंदणी अधिकारी यांची माहिती विधानसभा मतदार संघ निहाय राज्याचे व जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

## (६) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) कोण आहेत?

विधानसभा मतदार संघाच्या प्रत्येक मतदार यादी भागाकरिता शासकीय / निमशासकीय कर्मचा-याची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्ती करणेत येते. बीएलओ हे भारत निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्यक्षेत्रातील मतदार यादी भागाच्या मतदार यादी अद्ययावत ठेवणेचे काम करीत असतात. बीएलओ हे पूर्ण वेळ सदरचे काम करीत नाही. एक राष्ट्रीय कार्य म्हणून बीएलओ हे त्यांचे कार्यक्षेत्रातील मतदार यादी भागातील मतदारांचे मित्र, मार्गदर्शक व मदतगार म्हणून कार्य करीत असतात. बीएलओ हे त्यांचे मतदार यादी भागामधील कार्यक्षेत्रात माहिती गोळा करुन मतदार यादी भागातील मतदारांची नांवे स्थलांतर/मयत/दुबार असल्यास वगळणी करणे तसेच नवीन मतदारांची नांवे समाविष्ट करणे इ.कामे करतात.संबंधित मतदारांनी आपापल्या मतदार यादी भागातील बीएलओ यांचेशी संपर्क साधून वरिल कामाकरिता सहकार्य करणे अपेक्षित आहे. सर्व संबंधित बीएलओ यांचे नाव,पदनाम,संपर्क दूरध्वनी क्रमांक इ.माहिती राज्याचे व जिल्ह्याचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेली आहे.

## (७) छायाचित्र मतदार ओळखपत्र मिळणेकामी कोणते कागदपत्र आवश्यक आहेत ?

छायाचित्र मतदार ओळखपत्र प्राप्त झाल्यास सदरची व्यक्ती ही खालील बाबी सिध्द करु शकतो.

१) स्वतःची ओळख

२) रहिवासाचे ठिकाण

स्वतःची ओळख सिध्द करणेकामी छायाचित्र असलेले शासकीय / निमशासकीय संस्थेने किंवा शैक्षणिक संस्थेने दिलेले ओळखपत्र. जन्मतारीख सिध्द करणेकामी स्थानिक प्राधिकारी संस्थेने दिलेला जन्माचा दाखला किंवा शैक्षणिक संस्थेने दिलेला शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी कागदपत्र भारतीय नागरिकत्व व रहिवास पुरावा सिध्द करणेकामी आवश्यक असतात.

(८) ओळख सिध्द करणेकामी कोणताही पुरावा उपलब्ध नसल्यास काय करावे?

तुमचेकडे ओळख सिध्द करणेकामी कोणताही पुरावा उपलब्ध नसल्यास तुमच्या कुटुंबातील ज्या व्यक्तीकडे छायाचित्र मतदार ओळखपत्र आहे आणि ती व्यक्ती तुमच्या रक्ताच्या नातेसंबंधातील असलेबाबत व त्यांचे नांव मतदार यादीमध्ये समाविष्ट असलेबाबत कागदपत्र संबंधित बीएलओ किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे दाखल करु शकतात.

(९) जन्मतारखेचा पुरावा उपलब्ध नसल्यास काय होईल?

जर तुमच्याकडे जन्म तारखेचा पुरावा उपलब्ध नसेल तर, छायाचित्र मतदार ओळखपत्र तयार करतांना संबंधिताचे मतदार यादीमध्ये जे वर्ष नमूद असेल ते वर्ष नमूद करणेत येईल. उदा. ओळखपत्रावर तुमची जन्मतारीख XX/XX/१९५० अशी नोंदविणेत येईल. (तुमचा जन्म सन १९५० मध्ये झाला आहे असे गृहीत धरुन)

(१०) छायाचित्र मतदार ओळखपत्र गहाळ/खराब/फाटलेले असल्यास नवीन ओळखपत्र कसे मिळवाल?

नवीन छायाचित्र मतदार ओळखपत्र मिळणेकामी तुम्ही रक्कम रु २५/- भरुन दुबार (Duplicate) ओळखपत्र मिळणेकामी प्रतिज्ञापत्र दाखल केल्यास दुबार (Duplicate) ओळखपत्र देणेत येईल. जर तुमचे ओळखपत्र पूर, भूकंप, चक्रीवादळ इ. कारणाने गहाळ/खराब झाल्यास दुबार (Duplicate) ओळखपत्र मिळणेकामी कोणतीही रक्कम आकारली जाणार नाही. सदरच्या ओळखपत्रावर "Duplicate" असा शिक्का मारणेत येईल.

(११) रहिवासाचे ठिकाण बदलल्यास नवीन ओळखपत्र कसे मिळवाल?

ओळखीचा पुरावा म्हणून छायाचित्र मतदार ओळखपत्र हे भारतामध्ये कोठेही ग्राह्य धरले जाते. फक्त मतदान करणेकामी नवीन रहिवास पत्यावरील छायाचित्र मतदार ओळखपत्र घेणेची आवश्यकता नाही.

(१२) नवीन स्थलांतरीत पत्यावरील ओळखपत्र मिळणेकामी काय करावे?

नवीन स्थलांतरीत पत्यावरील छायाचित्र मतदार ओळखपत्र पाहिजे असल्यास प्रथम नवीन स्थलांतरीत पत्ता नमूद असलेल्या ठिकाणच्या मतदार यादी भागामध्ये नांव समाविष्ट झाले असल्याची खात्री करावी. विहित नमुना नं.८ मध्ये माहिती भरुन, जुने ओळखपत्र जोडावे व रक्कम रु २५ भरुन नवीन दुबार (Duplicate) ओळखपत्र संबंधित बीएलओ किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करावा व छायाचित्र मतदार ओळखपत्र बीएलओ यांचेमार्फत प्राप्त करुन घ्यावे.

(१३) ओळखपत्रावर / मतदार यादीमध्ये वडिलांचे/पतीचे नांव, वय, लिंग इ.माहिती चुकीची नमूद असलेचे आढळुन आल्यास काय करावे?

प्रथम मतदार यादीमध्ये सदरची माहिती योग्य आहे किंवा नाही हे तपासावे त्यामध्ये चुकीची माहिती नमूद असल्यास विहित नमुना नं.८ मध्ये व्यवस्थित मराठी / इंग्रजी भाषेमध्ये माहिती भरुन सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा बीएलओ यांचेकडे अर्ज दाखल करावा.

(१४) एका पेक्षा जास्त मतदार ओळखपत्र असल्यास काय करावे?

एका पेक्षा जास्त मतदार ओळखपत्र जवळ बाळगण्यास कायद्याने गुन्हा आहे.तुमचेकडील दुसरे ओळखपत्र त्वरीत सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी अथवा बीएलओ यांचेकडे जमा करावे व पोहच घ्यावी.

**ब) छायाचित्र मतदार यादी (Photo Electoral Roll)**

**१) मी भारतीय नागरिक आहे. माझे नांव छायाचित्र मतदार यादीमध्ये पहिल्यांदाच नोंदवावयाचे असल्यास काय करावे?**

छायाचित्र मतदार यादीमध्ये नांवे नोंदणीकामी विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरलेला अर्ज संबंधित बीएलओ किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे जमा करावा. अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) जन्माचा पुरावा (वय १८ वर्ष पूर्ण झाले आहे हे तपासणेकामी)
२) भारतीय नागरिकत्वाचा पुरावा
३) स्थानिक रहिवासी असल्याचा पुरावा
४) मतदार यादीमध्ये नांव नोंदणीकामी तसेच नाव वगळणी करणेकामी तसेच नांवात दुरुस्ती करणेकामी इत्यादी कामाकरिता भारत निवडणुक आयोगाने विहित केलेले नमुने खालिल भारत निवडणूक आयोगाचे/ राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्ह्याचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | विहित नमुना नंबर |
|---|---|---|
| १ | छायाचित्र मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे | नमुना नं.६ |
| २ | परदेशस्थ भारतीय नागरिक यांचे मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे | नमुना नं.६अ |
| ३ | छायाचित्र मतदार यादीमधून नांव वगळणी करणे (स्थलांतर/मयत/दुबार) | नमुना नं.७ |
| ४ | छायाचित्र मतदार यादीमध्ये झालेल्या चुकांची दुरुस्ती करणे | नमुना नं.८ |
| ५ | एकाच मतदार संघात परंतु एका मतदार यादी भागामधून दुस-या मतदार यादी भागामध्ये स्थलांतर झाले असल्यास | नमुना नं.८ अ |

## २) मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय इ.माहिती

प्रत्येक विधानसभा मतदार संघाच्या छायाचित्र मतदार यादी संदर्भात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (तहसिलदार), मतदार नोंदणी अधिकारी (उपविभागीय अधिकारी), उप जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी व भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे कार्यालयाचे पत्ते, संपर्क दुरध्वनी क्रमांक इ. माहिती पुढील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(१)www.ahmednagar.gov.in

(२) www.ceo.maharashtra.gov.in

(३) www.eci.nic.in

## ३) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचेशी कसा संपर्क साधाल?

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नियुक्ती शासकीय / निमशासकीय कर्मचा-यामधून केली जाते. सदरचे कर्मचारी यांना स्थानिक मतदार यादी भाग क्षेत्राची पूर्ण माहिती असते. बीएलओ हे भारत निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. प्रत्येक विधानसभा मतदार संघाच्या प्रत्येक मतदार यादी भाग क्षेत्राची परिपुर्ण माहिती ठेवणे. सदर मतदार यादी भागातील मतदारांना मतदार यादी अद्ययावत ठेवणेकामी मार्गदर्शन करणे. मतदारांना घरोघरी जावून भेटी देवून रेकॉर्ड अद्ययावत ठेवणेची जबाबदारी बीएलओ यांची आहे. बीएलओ यांचे नाव, पदनाम संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक इ.माहिती जिल्ह्याचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेली आहे. मतदार यादी अद्ययावत ठेवणेकामी लागणारे सर्व प्रकारचे विहित नमुने बीएलओ यांचेकडे उपलब्ध असलेने त्या मतदार यादी भागातील मतदारांना सहज उपलब्ध होणे सोईस्कर होते.

## ४) वयाचा पुरावा म्हणून कोणते कागदपत्र दाखल करावे?

वयाचा पुरावा म्हणून खालिल कागदपत्रे आवश्यक आहेत.

१) स्थानिक प्राधिकारी संस्था नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायत यांनी दिलेला जन्माचा दाखला

२) शैक्षणिक संस्थेने दिलेला शाळा सोडल्याचा दाखला

३) जर व्यक्ती एसएससी (इ.१० वी) व त्यापेक्षा वरील वर्गामध्ये दाखल असल्यास शैक्षणिक संस्थेने दिलेले जन्मतारीख नमूद असलेली गुणपत्रिका (मार्कशिट)

४) इ.८ वी चे मार्कशिट त्यामध्ये जन्मतारीख नमूद असणे आवश्यक.

५) इ.५ वी चे मार्कशिट त्यामध्ये जन्मतारीख नमूद असणे आवश्यक.

६) जर एखादी व्यक्ती अशिक्षीत असेल व त्यांचे कुटुंबामध्ये कोणीही शिक्षण घेतलेले नसल्यास सदरच्या व्यक्तीने प्रतिज्ञापत्र करुन बीएलओ/सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांचेसमक्ष पडताळणी करुन द्यावे किंवा

७) वया बाबत तसेच कुटुंबामध्ये कोणीही शिक्षण घेतलेले नसल्यास तसेच कुटुंबामध्ये कोणीही हयात नसल्यास ग्राम प्रधान ग्राम पंचायत किंवा संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी किंवा संबंधित महानगरपालिकेचे नगरसेवक यांनी दिलेले प्रमाणपत्र

**<u>विशेष टिप :-</u>** ज्या अर्जदाराचा जन्म दिनांक २६/०१/१९८९ किंवा त्यानंतर झालेला आहे अशा अर्जदारांना स्थानिक प्राधिकारी संस्था ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका यांनी दिलेले जन्म तारखेचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

**५) नागरिकत्वाचा पुरावा म्हणून कोणते कागदपत्र सादर करावे?**

नागरिकत्व सिध्द करणेसाठी खालिल कागदपत्र आवश्यक आहेत.

१) कुटुंबातील व्यक्तींचे छायाचित्र मतदार ओळखपत्र किंवा

२) स्थानिक प्राधिकारी संस्थेने दिलेला जन्म तारखेचा दाखला

३) पासपोर्ट

**६) स्थानिक रहिवाशी असलेबाबत कोणते कागदपत्र पुरावा म्हणून ग्राहय धरले जातात?**

खालिल कागदपत्र स्थानिक रहिवाशी असलेबाबत सहसा पुरावा म्हणून ग्राह्य धरले जातात.

१) बँक / किसान / पोस्ट चे चालु असलेले पासबुक किंवा

२) अर्जदाराचे रेशन कार्ड / पासपोर्ट / वाहन परवाना / आयकर भरलेबाबत स्टेटमेंट किंवा

३) चालू तारखेचे पाणी पट्टी / दूरध्वनी / वीज / गॅस कनेक्शन बील ज्यावर अर्जदाराचे किंवा कुटुंबातील व्यक्तीचे नांव व पत्ता नमूद आहे. किंवा

४) पोस्टाकडून अर्जदाराला प्राप्त झालेले पूर्ण पत्ता असलेले टपाल किंवा दुस-या व्यक्तीला टपाल पाठविलेबाबत पत्ता नमूद असलेली पोहच

५) अर्जदार हा बेघर असल्यास विहित नमुना नं.६ मध्ये नमूद केलेल्या पत्यावर बीएलओ यांनी रात्री समक्ष भेट देऊन अर्जदार हा नमूद केलेल्या पत्यावर निश्चित पणे झोपत आहे याची खात्री करेल. याकरिता कोणत्याही कागदपत्राची आवश्यकता असणार नाही. बीएलओ यांनी अर्जदाराच्या पत्यावर रात्री भेट देऊन खात्री करणे आवश्यक आहे.

**७) विहित नमुना नं.६ केव्हा दाखल करु शकतात?**

विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरुन खालिल ठिकाणी दाखल करु शकतात

१) जेव्हा पुनरिक्षण छायाचित्र मतदार यादी तयार करणेचा कार्यक्रम असेल त्यावेळी पदनिर्देशित अधिकारी () निश्चित केलेल्या पदनिर्देशित ठिकाणी (मतदान केंद्रावर) किंवा

२) पुनरिक्षण छायाचित्र मतदार यादी तयार करणेच्या कार्यक्रमामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचेकडे किंवा

३) निरंतर मतदार यादी तयार करणेच्या कार्यक्रमामध्ये सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे

विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरुन अर्ज दाखल केल्यानंतर पोहच घेणे आवश्यक आहे.

**८) कामासाठी / शिक्षणासाठी / तात्पूरत्या रहिवासी म्हणून परदेशामध्ये राहात असलेल्या भारतीय नागरिकांना मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करता येईल.**

भारत निवडणूक आयोगाने नूकत्याच जाहीर केलेल्या निर्णयानूसार विहित नमुना नं.६ अ मध्ये परदेशामये राहाणारे पात्र भारतीय नागरिकांना लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील तरतुदीनूसार मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे व दाखल करणे इ. तरतुद केलेली आहे.

आहे परंतू कोणत्याही देशाचे नागरिकत्व स्विकारलेले नाही. अशा भारतीय नागरिकांस पासपोर्ट मध्ये नमूद केलेल्या पत्यावर तेथील विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट / दाखल करता येईल.

### ९) परदेशस्थ भारतीय नागरिकांना मतदान कसे करता येईल?

परदेशस्थ भारतीय मतदाराला मतदान करणेकामी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर हजर राहून पासपोर्ट ची मूळ प्रत दाखवून मतदान करता येईल.

## क) पुनरिक्षण छायाचित्र मतदार यादी

### १. पुनरिक्षण मतदार यादी म्हणजे काय?

दर वर्षी भारत निवडणूक आयोगातर्फे छायाचित्र मतदार यादी तयार करणेकामी पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करणेत येतो. त्या वेळी पदनिर्देशित ठिकाणी (संबंधित मतदान केंद्रावर) मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे / नावात दुरुस्ती करणे / नाव स्थलांतर करणे / नाव वगळणी करणे इत्यादी कामे पुनरिक्षण मतदार यादी कार्यक्रमामध्ये केली जातात.

### २) पदनिर्देशित ठिकाणे म्हणजे काय?

पुनरिक्षण मतदार यादी तयार करणेच्या कार्यक्रमासाठी खालिल अधिका-यांची कार्यालये हे पदनिर्देशित ठिकाणे म्हणून असतात.

१) जिल्हा निवडणूक अधिकारी
२) संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय
३) संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय
४) मुख्याधिकारी / सेक्रेटरी नगरपरिषद / नगरपंचायत / कॅन्टोनमेंट यांचे कार्यालय
५) जिल्हा माहिती अधिकारी यांचे कार्यालय
६) पोस्ट ऑफिस
७) ग्राम पंचायत कार्यालय
८) का.तलाठी यांचे कार्यालय
९) संबंधित मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ)

### ३) निरंतर मतदार यादी तयार करणे म्हणजे काय?

अर्जदार हा वर्ष भरात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये मतदान यादीमध्ये नांव समाविष्ट करणे / नांव वगळणी करणे / नावात दुरुस्ती करणे इ कामाकरिता विहित नमन्यामध्ये थेट अर्ज दाखल करतात. सदरची प्रक्रिया वर्षभर चालू असते त्याला निरंतर मतदार यादी तयार करणेची प्रक्रिया असे म्हणतात.

सहसा दरवर्षी ५ जानेवारी ला अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली जाते. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेनंतर नांव समाविष्ट करणे / नावे वगळणी करणे / नावात दुरुस्ती करणे कामी दावे / हरकती बीएलओ किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे दाखल केली जातात.

## ४) मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) कोण आहे व त्यांचेशी कसा संपर्क साधता येईल?

विधानसभा मतदार संघाच्या प्रत्येक मतदार यादी भागाकरिता शासकीय / निमशासकीय कर्मचा-याची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्ती करणेत येते. बीएलओ हे भारत निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्यक्षेत्रातील मतदार यादी भागाच्या मतदार यादी अद्ययावत ठेवणेचे काम करीत असतात. बीएलओ हे पूर्ण वेळ सदरचे काम करीत नाही. एक राष्ट्रीय कार्य म्हणून बीएलओ हे त्यांचे कार्यक्षेत्रातील मतदार यादी भागातील मतदारांचे मित्र, मार्गदर्शक व मदतगार म्हणून कार्य करीत असतात. बीएलओ हे त्यांचे मतदार यादी भागामधील कार्यक्षेत्रात माहिती गोळा करुन मतदार यादी भागातील मतदारांची नांवे स्थलांतर/मयत/दुबार असल्यास वगळणी करणे तसेच नवीन मतदारांची नांवे समाविष्ट करणे इ.कामे करतात.संबंधित मतदारांनी आपापल्या मतदार यादी भागातील बीएलओ यांचेशी संपर्क साधून वरिल कामाकरिता सहकार्य करणे अपेक्षित आहे. सर्व संबंधित बीएलओ यांचे नाव,पदनाम,संपर्क दूरध्वनी क्रमांक इ.माहिती राज्याचे व जिल्ह्याचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेली आहे.

## ५) अर्जाचे विहित नमने कोठे मिळतील?

मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे तसेच नाव वगळणी करणेकामी तसेच नांवात दुरुस्ती करणेकामी इत्यादी कामाकरिता भारत निवडणुक आयोगाने विहित केलेले नमुने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) / सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (तहसिलदार) यांचे कार्यालयात उपलब्ध आहे तसेच खालिल भारत निवडणूक आयोगाचे/ राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी /जिल्ह्याचे संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेले आहे.

(१)www.ahmednagar.gov.in

(२) www.ceo.maharashtra.gov.in

(३) www.eci.nic.in

| अ.नं. | तपशिल | विहित नमुना नंबर |
|---|---|---|
| १ | छायाचित्र मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे | नमुना नं.६ |
| २ | परदेशस्थ भारतीय नागरिक यांचे मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणे | नमुना नं.६अ |
| ३ | छायाचित्र मतदार यादीमधून नांव वगळणी करणे (स्थलांतर/मयत/दुबार) | नमुना नं.७ |
| ४ | छायाचित्र मतदार यादीमध्ये झालेल्या चुकांची दुरुस्ती करणे | नमुना नं.८ |
| ५ | एकाच मतदार संघात परंतु एका मतदार यादी भागामधून दुस-या मतदार यादी भागामध्ये स्थलांतर झाले असल्यास | नमुना नं.८ अ |

**६) लग्न झालेल्या विवाहीत महिलेला प्रथमच छायाचित्र मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणेकामी कोणते कागदपत्र सादर करावे लागतील?**

विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरुन खालिल कागदपत्र जोडून बीएलओ / सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करु शकतात.

१) वयाचा पुरावा

२) नागरिकत्वाचा पुरावा (कुटुंबातील व्यक्तीकडे असलेले छायाचित्र मतदार ओळखपत्राची प्रत)

३) लग्नापुर्वीचा स्थानिक रहिवासचा पुरावा

४) लग्ना झाले असलेबाबत पुरावा (विवाह नोंदणी दाखला)

५) ज्या मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करावयाचे आहे त्या मतदार यादी भागामधील कुटुंबातील व्यक्तीचे नांव असलेबाबत मतदार यादीची सत्यप्रत

६) लग्नानंतरचा स्थानिक रहिवासचा पुरावा

**७) लग्न झालेली महिला असून तिच्याकडे लग्न झालेचा पुरावा उपलब्ध नाही अशावेळी नव-याचे नांव ज्या मतदार यादीमध्ये आहे त्या मतदार यादीमध्ये तिचे नांव समाविष्ट करणेकामी काय करावे?**

विशेष प्रकरणामध्ये मतदार नोंदणी अधिकारी हे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना स्थानिक चौकशी करणेकामी व अर्जदार महिलेचे खरोखरच लग्न झाले आहे याची खात्री करणेस सांगेल. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी केलेल्या चौकशीअंती सदर महिलेचे लग्न झाले असून सदरची महिला ही नव-याचे घरी राहात आहे असा अहवाल सादर केल्यानंतर मतदार नोंदणी अधिकारी हे सदर महिलेचे नांव नव-याचे नांव ज्या मतदार यादी भागामध्ये नोंदविणेत आलेले आहे त्या मतदार यादी भागामध्ये नांव समाविष्ट करणेबाबत अथवा अर्ज नाकारणेबाबत कार्यवाही करेल.

**८) राज्यातील पुनरिक्षण मतदार यादीचा कार्यक्रम संपलेला आहे. छायाचित्र मतदार ओळखपत्र मिळणेकामी एक वर्ष थांबावे लागेल काय?**

नाही. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेनंतर विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरुन व आवश्यक ते कागदपत्र व पासपोर्ट साईज दोन फोटो जोडून बीएलओ किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करु शकतात.

**९) लिंकेज (संबंध) म्हणजे काय? छायाचित्र मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणेकामी त्यांची काय आवश्यकता असते?**

प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणेपुर्वी मतदार यादी भागातील कुटुंबातील एक किंवा एकापेक्षा जास्त व्यक्तींचे नांव असल्यास सदरची नांवे एकाखाली एक अशी केली जातात त्यामुळे कुटुंबातील व्यक्तींचे नातेसंबंध शोधण्यास मदत होते.

**१०) नांव समाविष्ट कोठे करु शकतात? कुटुंबातील व्यक्तींचे नांव जिथे आहे त्या ठिकाणी नांव समाविष्ट करावयाचे नसलयास काय करावे?**

करु शकतात मतदाराला त्याचे नांव कुटुंबातील व्यक्तीबरोबर नको असेल तर मतदाराने याकामी स्वतंत्ररित्या नागरिकत्व, वय आणि स्थानिक रहिवासाचा पुरावा

## दुरुस्ती करणे

### (१) नांव / वय / पत्ता इ. दुरुस्ती करणेकामी काय करावे?

मतदाराने विहित नमुना नं.८ मध्ये माहिती भरुन आवश्यक पुराव्याचे कागदपत्र जोडून पुनरिक्षण मतदार यादी तयार करणेचे कार्यक्रमाचे वेळी किंवा निरंतर मतदार यादी तयार करणेचे कामी बीएलओ किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करु शकतात.

### (२) दुरस्ती करणेकामी कोणताही पुरावा उपलब्ध नसल्यास, दुरुस्ती बाबत दिलेला अर्ज ग्राह्य धरला जाईल काय?

लिंग किंवा पीन कोड मध्ये झालेल्या चुका दुरुस्त करता येईल परंतु इतर कोणतीही दुरुस्ती कागदपत्रांच्या पुराव्यासह करता येणार नाही.

## वगळणी करणे

### (१) कुटुंबातील एका व्यक्तीचे निधन झाले आहे / एक व्यक्तीने परदेशी नागरिकत्व स्विकारले आहे. अशा वेळी त्या मतदारांचे नांवे वगळणी करणेकामी काय करावे?

विहित नमुना नं. ७ मध्ये माहिती भरुन अर्जासोबत मृत्युचा दाखला/परदेशी नागरिकत्व स्विकारलेबाबतचा पुरावा जोडून अर्ज बीएलओ / सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे पुनरिक्षण मतदार यादी कार्यक्रमाचे वेळी दाखल करावा. मतदार नोंदणी अधिकारी हे सदर मतदारांची नांवे अर्जदारांना योग्य ती नोटीस देऊन व सुनावणी घेऊन वगळणी करणेची कार्यवाही करतील.

## स्थलांतर

### (१) आहे त्याच विधानसभा मतदार संघाच्या एका मतदार यादी भागातून दुस-या मतदार यादी भागामध्ये रहिवास पत्ता बदलल्यास व जुन्या मतदार यादी भागाचे मतदान केंद्र व बदललेल्या पत्यावरील मतदार यादी भागाचे मतदान केंद्र वेगवेगळया ठिकाणी असल्यास नवीन स्थलांतरीत पत्यांवर नांव समाविष्ट करणेकामी काय करावे?

मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करणेकामी विहित नमुना नं.८अ मध्ये माहिती भरुन त्यासोबत छायाचित्र मतदार ओळखपत्राची सत्यप्रत व रहिवास ठिकाणचा कागदोपत्री पुरावा जोडून अर्ज दाखल करावा.

## स्थलांतरीत मतदार

(१) मतदार यादीतील नांव एका विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीतून अन्य विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी पुर्वीच्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमधील नांव वगळणे आवश्यक आहे काय?

पहिले नांव ज्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये आहे तेथील नांव वगळणी करणेकामी स्वतंत्र अर्ज करणेची आवश्यकता नाही तथापि नवीन ठिकाणी नांव समाविष्ट करणेकामी विहित नमुना नं.६ मध्ये माहिती भरताना पुर्वी ज्या विधानसभा मतदार संघाच्या